आजचा शुभ विचार

""बुद्धिमत्तेचा विकास हे मानवी अस्तित्वाचे अंतिम लक्ष्य असले पाहिजे"आपण नेहमी काहीतरी शिकत राहिले पाहिजे. आपले ज्ञान वाढविण्यावर भर दिला पाहिजे"

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!








मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ■ MARATHI ■ YEAR- 3 ■ ISSUE-23 ■ Published from NASHIK (MAH) ■ Saturday 24 May 2025 ■ PAGES 4 ■ Price - 4 Rs.

दैनिक ■ मराठी ■ वर्ष ३ ■ अंक २३ ■ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ■ शनिवार, दि. २४ मे २०२५ ■ पाने ४ ■ ₹ ४ रुपये


## वैष्णवीला छळणाऱ्या हगवणे बापलेकाला अटक

अभिजित कुलकर्णी
पुणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------

पैशांसाठी सतत छळणाऱ्या हगवणे कुटुंबाच्या जाचाला कंटाळून वैष्णवीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आज म्हणजेच शुक्रवार २३ मे रोजी हगवणे बापलेकाला अटक केली. वैष्णवीचा सासरा राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील हगवणे या दोघांना स्वारगेट परिसरातून अटक करण्यात आली. राजेंद्र आणि सुशील एका हॉटेलमध्ये जेवतानाचे



सीसीटीव्ही फुटेज पुणे पोलिसांच्या हाती आले. फूटेजमध्ये राजेंद्र आणि सुशील हॉटेलमध्ये मटण खाताना दिसत होते. यानंतर पोलिसांनी वेगाने कारवाई केली. झोपेत असलेल्या हगवणे बापलेकाला जागं करुन पहाटे साडेचार वाजता अटक केली. दोघांना तातडीने पोलीस उपायुक्त कार्यालयात नेण्यात आले. पोलीस दोघांनाही पुढील २४ तासांत न्यायालयात हजर करणार आहेत. वैष्णवीचा पती शशांक, सासू लता आणि नणंद करिष्मा यांना याआधीच अटक करण्यात आली आहे. काल रात्री राजेंद्र यांचा भाऊ संजय हगवणेला अटक करण्यात आले. वैष्णवीने छळाला वैतागून टोकाचे पाऊल उचलल्याची बातमी येताच राष्ट्रवादी काँग्रेसने हगवणे कुटुंबाशी असलेले संबंध तोडण्याचा निर्णय घेतला. अजित पवारांनी वैष्णवीच्या आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई होईल, असे जाहीर केले. यानंतर सूत्रं वेगाने फिरली. आतापर्यंत वैष्णवी हगवणे प्रकरणात पाच जणांना अटक करण्यात आली आहे. वैष्णवीच्या मुलाचा ताबा तिच्या आईवडिलांकडे म्हणजेच कस्पटे दांपत्याकडे देण्यात आला आहे. पोलिसांनी वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणी पती शशांक हगवणे, सासू लता, नणंद करिष्मा, सासरा राजेंद्र आणि दीर सुशील या पाच जणांना अटक केली आहे.

## "६ जूनचा शिवराज्याभिषेक नामशेष करावा"

### शिव प्रतिष्ठान चे संस्थापक संभाजी भिडेंचं वक्तव्य चर्चेत

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------

तारखेनुसार ६ जून रोजी किल्ले रायगडावर होणारा शिवराज्याभिषेक नामशेष करावा, असं विधान संभाजी भिडे यांनी केलं आहे. आज त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. राज्यात तिथीनुसार आणि तारखेनुसार शिवराज्याभिषेक साजरा केला जातो. परंतु, ६ जून रोजी तारखेनुसार होणारा शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या प्रमाणात साजरा होतो. यावरून तिथीनुसार होणाऱ्या शिवराज्याभिषेकाविषयी पत्रकारांनी



विचारलं असता संभाजी भिडे म्हणाले, ६ जूनचा शिवराज्याभिषेक नामशेष केला पाहिजे. ७६ वर्षे झाली तरीही आपलं मानसिक अधिष्ठान ब्रिटिशांकडे स्वाधीन ठेवलंय. महाराजांचा राज्याभिषेक झाला त्या तिथीप्रमाणेच शिवराज्याभिषेक स्मरण दिन केला पाहिजे. ६ जूनचा बंद केला पाहिजे."

#### एकनाथ शिंदेंच्या भेटीत कोणत्या विषयावर चर्चा?

संभाजी भिडे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. या भेटीबाबत विचारलं असता ते म्हणाले, "आमच्या भेटीत देश, देव, धर्मावर चर्चा झाली. व्यक्तिगत किंवा राजकीय चर्चा झालेली नाही."

#### वैष्णवी हगवणे प्रकरणावर काय म्हणाले संभाजी भिडे

"हुंडा पद्धत देशाला कलंक असलेली गोष्ट आहे. त्यामुळे हुंडा पद्धत नामशेष झाली पाहिजे.पण हे करताना राजकारण करता कामा नये", असं संभाजी भिडे म्हणाले.

## ग्रामीण भागातील अकरावी प्रवेश ऑनलाईन घेण्यास विरोध,

### गोंधळानंतर राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**ओम सोमवंशी**
**मुंबई प्रतिनिधी**
**दैनिक स्वराज्यदूत**

------------------------------

संपूर्ण राज्यभरात यंदा पहिल्यांदाच राबवण्यात येणाऱ्या केंद्रिभूत अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्याच दिवशी तांत्रिक बिघाड झाल्यानंतर आता शिक्षण क्षेत्रातून ग्रामीण भागात प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन घेण्यास विरोध होऊ लागला आहे. ग्रामीण भागात नेटवर्कची समस्या, विद्यार्थी व पालकांकडे अँड्रॉइड मोबाइल नसणे, सायबर कॅफेसाठी लागणारे अतिरिक्त पैसे या अडचणी लक्षात घेऊन ग्रामीण भागात अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑफलाइन पद्धतीनेच घेण्यात यावी, अशी मागणी राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि शालेय शिक्षणमंत्र्यांना पत्र पाठवून केली आहे. अकरावी ऑनलाइन प्रवेशाची प्रक्रिया राज्यभरात राबविण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. मात्र प्रवेशाच्या पहिल्याच दिवशी संकेतस्थळामध्ये झालेल्या बिघाडामुळे विद्यार्थांना मानसिक ताणाला सामोरे जावे लागले. या पद्धतीमुळे विद्यार्थी व पालक यांची ससेहोलपट होत आहे. पालकांना सक्तीने अँड्रॉइड फोन घ्यावा लागणार असून, महाविद्यालये सुरू व्हायलाही उशीर होणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील




विद्यार्थ्यांना कोणताच फायदा होणार नसून उलट त्यांचे नुकसानच होणार आहे. आर्थिक व शैक्षणिक नुकसान करणारी ही ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया तत्काळ थांबवून पूर्वीप्रमाणे ऑफलाइन पद्धतीने प्रवेश देण्याची मुभा महाविद्यालयांना देण्यात यावी, अशी विनंती करत राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने ऑनलाईन पद्धतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची होणारी कोंडी पत्राद्वारे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व शिक्षणमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. मुख्यमंत्र्यांना लिहलेल्या पत्रामध्ये महासंघाने ऑनलाईन पद्धतीमुळे ग्रामीण भागाता येणाऱ्या अडचणी मांडल्या आहेत.

#### महासंघाने मांडलेल्या अडचणी

१) ग्रामीण भागात नेटवर्कचा अभाव
२) आदिवासी व डोंगराळ भागातील विद्यार्थी किंवा पालकांकडे अँड्राइड मोबाइल नाही.
३) अकरावीतील उपलब्ध जागांपेक्षा विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे.
४) विद्यार्थी, पालक तसेच शैक्षणिक संस्थांकडूनही ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवण्याची मागणी नाही.
५) विद्यार्थी, पालक व शिक्षकांना ऑनलाईन पद्धतीचे पुरेसे ज्ञान नाही
६) सायबर कॅफे व इतरांकडून अर्ज भरण्यासाठी विद्यार्थी व पालकांची लूट
७) उन्हाळ्याच्या सुट्टीतही शिक्षकांनी उपस्थित राहावे लागेल, मात्र त्यातून काही निष्पन्न होणार नाही.
८) अकरावीचे वर्ग सुरू होण्यास विलंब झाल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होईल.
९) ऑनलाईन प्रक्रियेसाठी अकारण खर्च करावा लागत आहे.
१०) प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्याच दिवशी तांत्रिक बिघाडामुळे प्रक्रिया खोळंबल्याने पालक व शिक्षकांना त्रास.

## पंतप्रधान मोदींची कर्तव्यपूर्ती अन् जनतेची स्वप्नपूर्ती!

### अमृत भारत स्थानकं जनतेच्या सेवेत

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------------

कितीही टीका झाली तरी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विकासाचा कर्तव्यपथ सोडलेला नाही. लोकाभिमुख विकासकामांवर त्यांनी मोठा भर दिलाय. विकसित भारत या स्वप्नपूर्तीच्या दिशेनं पंतप्रधान मोदींनी एक एक पाऊल पुढं टाकलंय. देशातील अमृत भारत स्थानकांचं लोकार्पण करतानाच त्यांनी भारताचं उद्दिष्ट काय असेल यांचे स्पष्ट संकेत दिले आहेत. एकीकडे भारत - पाकिस्तान युद्धविरामावर चर्चा सुरू आहेत तर दुसरीकडे लोकाभिमुख विकासकामांचं लोकार्पण करण्यात येतंय. या सर्वांचं श्रेय जातयं ते पंतप्रधान नरेंद्र मोदींना. अमृत भारत स्थानक योजनेंतर्गत विकसित केलेल्या देशातील अनेक रेल्वे स्थानकांचं पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते उद्घाटन झालंय. बिकानेर - मुंबई एक्स्प्रेसला पंतप्रधान मोदींनी हिरवा झेंडा दाखवला. इतकंच नव्हे तर जवळपास २६ हजार कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्घाटन आणि लोकार्पण त्यांनी केलंय. पंतप्रधान मोदींनी जनतेला दिलेल्या आश्वासनांची वचनपूर्ती केलीय. यात रेल्वेसेवेचा विस्तार महत्त्वाचा होता. पंतप्रधान मोदींनी देशातील १८ राज्यं, केंद्रशासित प्रदेशातील ८६ जिल्ह्यांतील १०३ पुनर्विकसित अमृत रेल्वे स्थानकांचं



उद्घाटन केलंय. या रेल्वे स्थानकांसाठी १,१०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च झालाय. तर अमृत भारत स्थानक योजनेंतर्गत १,३०० पेक्षा जास्त स्थानकांचा आधुनिक सेवा सुविधांसह पुनर्विकास केला जातोय.

#### रेल्वे स्थानकांच्या उभारणीत प्रादेशिक वास्तुकलेचं प्रतिबिंब दिसतंय.

#### आता पाहूयात अमृत रेल्वे स्थानकांची वैशिष्ट्ये

१) राजस्थानमध्ये देशनोक रेल्वेस्थानकावर करणी माता मंदिराची वास्तुकला प्रतिबिंबित आहे.

१) तेलंगणामध्ये बेगमपेट रेल्वेस्थानकावर काकतीय साम्राज्य वास्तुकला प्रतिबिंबित आहे.

१) बिहारमध्ये थावे रेल्वेस्थानकावर माता थावेवाली यांची वास्तुकला प्रतिबिंबित आहे.

१) गुजरातमध्ये डाकोर रेल्वेस्थानकावर रणछोडरायजी महाराज यांची वास्तुकला प्रतिबिंबित आहे.

या सर्व रेल्वे स्थानकांचा विकास करतानाच भारताचं व्हिजन काय आहे, हेही दिसून येतंय. सर्वसामान्यांसाठी सुविधा आणि प्रवासाचा समृद्ध अनुभव घेता येईल अशा प्रकारच्या शाश्वत पद्धतींचं अनोखं एकात्मतीकरण पंतप्रधान मोदींनी घडवून आणलंय.

#### १०० विद्युतीकरण झालेली रेल्वे स्थानकं कोणती आहेत ते पाहूया...

**सूरतगड-फलोदी, ३३६ किमी**
**फुलेरा-डेगाना, १०९ किमी**
**उदयपूर-हिम्मतनगर, २१० किमी**
**फलोदी-जैसलमेर, १५७ किमी**
**समदारी-बाडमेर, १२९ किमी**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तीन भुयारी मार्ग, राष्ट्रीय महामार्गांचं रुंदीकरण, राजस्थानातील ७ रेल्वे प्रकल्पांचं लोकार्पण केलंय. तसंच त्यांनी सुमारे ४,८५० कोटी रुपयांहून अधिक रस्ते प्रकल्पांची पायाभरणी केलीय. पंतप्रधान मोदींच्या हस्ते विविध सौर्जऊर्जा आणि ऊर्जा प्रकल्पांची पायाभरणी, विविध आरोग्यसेवा, पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा योजनांची पायाभरणी, लोकार्पण आणि उद्घाटन झालंय. मोदी हैं तो मुमकिन हैं असं म्हटलं जातं. दहशतवादाचा बीमोड करतानाच देशाच्या विकासाला चालना देणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे विकासपुरुष म्हणून पाहिलं जातं, त्याला हिच कारणं आहेत.

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते पुनर्विकसित 103 स्थानकांचे उद्घाटन

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

---------------------

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बिकानेरमधून व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे एकाचवेळी देशातील पुनर्विकसित केलेल्या १०३ रेल्वे स्थानकांचे उद्घाटन करण्यात आले. भारतातील १८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ८६ जिल्ह्यांमध्ये ही १०३ रेल्वे स्थानके आहेत. यात महाराष्ट्रातील पंधरा स्थानके आहेत. अमृत भारत योजनेंतर्गत महाराष्ट्रातील आमगाव, चांदा फोर्ट, चिंचपोकळी, देवळाली, धुळे, केडगाव, लासलगाव, लोणंद जंक्शन, माटुंगा, मूर्तिजापूर जंक्शन, नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी जंक्शन, परळ, सावदा, शहाड व वडाळा रोड या स्थानकांचा कायापालट करण्यात आला आहे. पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते पुनर्विकसित केलेल्या १०३ रेल्वे स्थानकांचे उद्घाटन करण्यात आले. या सोहळ्यात महाराष्ट्रातील मुंबईच्या परळ स्थानकातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी अमृत भारत योजनेतील कामाचे कौतुक केले. तसेच या योजनेसाठी पंतप्रधान मोदी आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले. सरकारने राबवलेल्या



अमृत भारत योजनेत रेल्वे स्थानकांचा कायापालट करण्यात आला. प्रवाशांकरिता सुखसोयींची व्यवस्था करण्यात आली. रेल्वे स्थानकाच्या दर्शनी भागाचे रुपडे पालटताना स्थानिक भागात कोणत्या संस्कृतीचा अथवा परंपरेचा प्रभाव आहे का याचा प्रधान्याने विचार करण्यात आला. रेल्वे स्थानकात प्रवाशांना विविध प्रकारची माहिती देण्यासाठी सहज दिसतील आणि पटकन वाचून समजतील असे डिस्प्ले बोर्ड आणि इंडिकेटर ठिकठिकाणी बसवण्यावर भर देण्यात आला. स्थानकात येण्याजाण्याचे मार्ग तसेच स्थानकातील जिने - पादचारी पूल, लिफ्ट, एस्कलेटर हे सर्व प्रशस्त करुन प्रवाशांची सोय करण्यात आली. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, महिला आणि पुरुषांसाठीची स्वच्छतागृहे, सीसीटीव्ही, सार्वजनिक घोषणा प्रणाली या सर्व व्यवस्थांचे आधुनिकीकरण करण्यात आले. वृद्ध आणि दिव्यांगांसाठी स्थानकावर ठिकठिकाणी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. स्थानकाजवळ प्रशस्त वाहन तळ उभारण्यात आले. प्रचंड गर्दीच्या स्थानकांवर फूड कोर्ट, किओस्क, रिटेल आऊटलेटची विशेष व्यवस्था करण्यात आली. लांब पल्ल्याच्या गाड्या ज्या स्थानकांवर थांबतात तिथे प्रतीक्षालय, बसण्याची प्रशस्त जागा, प्रकाशयोजना, वायुवीजन, स्वच्छता यावर प्रचंड भर देण्यात आला आहे. केंद्र सरकार अमृत भारत योजनेत देशातील १३०० पेक्षा जास्त रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास करत आहे. याच योजनेंतर्गत १०३ स्थानकांच्या पुनर्विकासाचे काम करण्यात आले आहे. या स्थानकांचे एकाचवेळी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे पंतप्रधान मोदींनी उद्घाटन केले. अमृत भारत योजनेअंतर्गत प्रादेशिक वास्तुकला प्रतिबिंबित करण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी डिझाइन केलेल्या १,३०० हून अधिक स्थानकांचा पुनर्विकास आधुनिक सुविधांसह केला जात आहे. करणी माता मंदिरात येणाऱ्या यात्रेकरू आणि पर्यटकांना सेवा देणारे देशनोके रेल्वे स्थानक मंदिर वास्तुकला आणि कमान आणि स्तंभ थीमने प्रेरित आहे. तेलंगणातील बेगमपेट रेल्वे स्थानक काकतिया साम्राज्याच्या स्थापत्यकलेपासून प्रेरित आहे. बिहारमधील थावे स्थानकात ५२ शक्तीपीठांपैकी एक असलेल्या माँ थवेवलीचे प्रतिनिधित्व करणारे आणि मधुबनी चित्रांचे चित्रण करणारे विविध भित्तिचित्रे आणि कलाकृतींचा समावेश आहे. गुजरातमधील डाकोर स्थानक रणछोदराई जी महाराजांपासून प्रेरित आहे. भारतातील पुनर्विकसित अमृत स्थानकांमध्ये सांस्कृतिक वारसा, दिव्यांगजनांसाठी असलेल्या प्रवाशां-केंद्रित सुविधांसह आधुनिक पायाभूत सुविधा आणि प्रवासाचा अनुभव वाढविण्यासाठी शाश्वत पद्धतींचा समावेश आहे.

सम्पादकीय

# हुंडाबळीचा पुण्यात लांच्छनास्पद बळी

एकेकाळी विद्येचे माहेरघर अशी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत ख्याती असलेल्या पुणे शहराच्या नावालौकिकाला, गौरवशाली परंपरेला गेल्या काही काळापासून ओहोटी लागलेली आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवछत्रपतींचे बालपण या पुणे शहरामध्ये गेले आहे. महिला शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले, समाजसुधारक जोतिबा फुले यांच्या कार्याची मुहूर्तमेढ व उभी हयात या पुणे शहरामध्ये गेली. शिवछत्रपतींनंतर संभाजी महाराज, राजाराम महाराज, राणी ताराबाई यांच्यानंतर स्वराज्याची धुरा ज्या पेशव्यांनी सांभाळली, त्या पेशव्यांनी स्वराज्याचा कारभार याच पुण्यातील शनिवार वाड्यातून चालविला आहे. प्लेगसारख्या जीवघेण्या आजाराचा सामनाही याच पुणे शहराने खंबीरपणे केला. पुणे शहराच्या सावलीतच हाकेच्या अंतरावरील देहू-आळंदीमध्ये जगतगुरू संत तुकोबाराय, ज्ञानेश्वर माऊली यांनी वारकरी सांप्रदायाची सेवा केली. अभंग, हरिपाठ रचिले, विचारांची भिंत चालविली, रेड्यामुखी वेद बोलविले. असा नावलौकिक या पुणे शहराचा आहे. पण आज कधी कोयता गँग तर कधी अपहरण, कधी गोळीबार, कधी खंडणी युद्ध, राजकीय हत्या, अपहरण, रुग्णालयीन कारभाराचे गैरव्यवहार, तर कधी कुबेरपुत्रांकडून घडलेले अपघात अशा विविध घटनांनी पुणे शहराचा नावलौकिक इतिहासजमा होत चालला असून या शहराच्या वैभवाला, सांस्कृतिक इतिहासाला काळिमा फासण्याच्या घटना मोठ्या संख्येने घडू लागल्या आहेत. आता काहीसे वातावरण निवळत चालले असताना प्रेमविवाह केलेल्या वैष्णवीच्या आत्महत्येने पुन्हा वातावरण ढवळून निघाले असून पुणे शहर पुन्हा एकवार चर्चेच्या प्रकाशझोतात आले आहे. वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणामुळे राज्यभरात संताप व्यक्त केला जात आहे. वैष्णवी हगवणेने सासरी होणाऱ्या छळाला कंटाळून स्वतःचे आयुष्य संपवले असे म्हटले जात आहे. पण तिची हत्या झाल्याचा दावा वैष्णवीच्या घरचे करत आहेत. हुंड्यापायी वैष्णवीचा जीव गेल्याचे स्पष्ट झाले आहे. यादरम्यान वैष्णवीचा जाऊ मयूरीने हगवणे कुटुंबाबाबत धक्कादायक माहिती दिली आहे. मुळातच वैष्णवी आणि शशांक यांचा प्रेमविवाह झाला होता. प्रेमविवाह होण्यापूर्वी काही वर्षे उभयतांचे एकमेकांवर प्रेम होते. सासरच्या छळामुळे वैष्णवीने आत्महत्या केली असल्याचा सुरुवातीच्या काळात अंदाज व्यक्त केला जात असला तरी शवविच्छेदनाचा अहवाल आल्यानंतर ही आत्महत्या नसून हत्या असल्याचा संशय आता विविध घटकांकडून व्यक्त केला जावू लागल्याने हे प्रकरण काही वेगळेच निघण्याची शक्यता आहे. हा प्रेमविवाह होता, परंतु हगवणे परिवाराची वाढती हाव व त्यातून वैष्णवीचा वाढत चाललेले छळ आणि या प्रेमविवाहाची अखेर आत्महत्येत झाली. वैष्णवी ही कस्पटे या सधन परिवारातील मुलगी होती. हुंड्यात मिळालेला निधी व त्यातून दोन कोटी रुपयांची मागणी, अन्य वस्तूंची मागणी पाहिल्यावर हा प्रेमविवाह नसून केवळ वैष्णवीच्या माहेरी असलेला पैसा लाटण्यासाठीच शशांक हगवणे याने प्रेमाच्या नावाखाली भुलविले असल्याचे, गळाला लावले असल्याचे स्पष्ट झाले आहे. सधन घरातील वैष्णवीने जर वेळीच आई-वडिलांचे म्हणणे ऐकले असते तर तिला आज जीव गमवावा लागला नसता, असा सूर आता पुणेकरांकडून आळविला जावू लागला आहे. वैष्णवीच्या लग्नाला तिच्या घरातल्यांनी म्हणजेच कस्पटे कुटुंबाने विरोध दर्शवला होता. मात्र वैष्णवीला शशांकशीच लग्न करायचे होते. अखेर वैष्णवीच्या नातेवाइकांनी कस्पटे परिवाराची समजूत काढल्यावर वैष्णवीच्या वडिलांनी थाटामाटात विवाह लावून दिला. हुंड्यामध्ये ५१ तोळे सोने, फॉर्च्युनर गाडी, चांदीची भांडी असे कस्पटे परिवाराने देऊनही हगवणे परिवाराचे समाधान झाले नाही. विवाहानंतर मात्र हगवणे कुटुंबाची हाव काही संपली नाही, उलट ती वाढतच गेली. विवाहाच्या वेळी १ लाख २० हजारांचे घड्याळ शशांकने मागून घेतले होते. त्यानंतर आता काही दिवसांपूर्वी जमीन घ्यायची असल्याचे सांगत शशांकने कस्पटे परिवाराकडे दोन कोटींची मागणी केली होती. ते पैसे न मिळाल्याने वैष्णवीचा छळ वाढत गेला. सासरच्या मंडळींकडून वैष्णवीला बेदम मारहाण होत असे. वैष्णवी गर्भवती राहिल्यावर तिच्या चारित्र्यावरच संशय घेण्यात आला. वैष्णवीचा मृत्यू गळ्याजवळ झालेल्या फासाने झाला आहे. पण तिच्या मृतदेहावर धारदार वस्तूने वार केल्याच्या अनेक जखमा देखील आढळून आल्या असल्याचे शवविच्छेजन अहवालामध्ये म्हटले आहे. वैष्णवीला हुंड्यावरून तिच्या सासरचे लोक त्रास देत होते, तिने आत्महत्या केली नसून तिचा खून झाला आहे असा वैष्णवीच्या वडिलांनी दावा केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी शशांक हगवणे (वैष्णवीचा पती), लता हगवणे (सासू) आणि करिष्मा हगवणे (नणंद) यांना अटक केली आहे. सासरे राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील हगवणे फरार आहेत. वैष्णवीच्या नवऱ्याला हुंड्यात दिलेली आलिशान फॉर्च्यूनर कार पोलिसांनी जप्त केली आहे. मुळात कस्पटे परिवाराने विवाहात इतका खर्च केल्याने, दागिने, महागडी गाडी व अन्य वस्तूंची भेट दिल्यानेच हगवणे परिवाराचा स्वार्थ वाढत गेला. कस्पटे परिवाराने साधेपणाने विवाह करत महागड्या भेटवस्तू नाकारल्या असत्या तर हगवणे परिवारानेही अपेक्षा व्यक्त केल्या नसत्या. अर्थात या सर्व जर-तरच्या आहेत. आता त्याला अर्थ नाही. पुण्यासारख्या सुसंस्कृत शहरात वैष्णवीच्या रूपाने हुंडाबळीची घटना घडली आहे. एकीकडे कस्पटे या धनाढ्य कुटुंबाला आपली मुलगी गमवावी लागली तर प्रेमविवाहाच्या अट्टहासापायी घरच्यांचे म्हणणे न जुमानता चुकीच्या घराची निवड केल्याची किंमत वैष्णवीला आपले जीवन संपवून मोजावी लागली आहे. हगवणे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मुळशी तालुकाध्यक्ष असले तरी उपमुख्यमंत्री अजित पवारांनी हगवणे परिवाराला फटकारले आहे. संबंधितांच्या अटक करण्याचे निर्देश देऊन वैष्णवीच्या लहान मुलाला कस्पटे परिवाराच्या स्वाधीन करण्याच्या पोलिसांना सूचना दिल्या आहेत. पुण्यासारख्या सुसंस्कृत शहरात हुंडा देण्याघेण्याच्या घटना घडतात, त्यातून हुंडाबळीच्या घटना जन्माला येतात, हे सर्वच घृणास्पद आहे. अशा गोष्टी पुणे शहराच्या नावलौकिकाला शोभनीय नाहीत. प्रेमविवाहाची अखेर स्मशानाच्या मार्गावर गेल्याने हळहळ व्यक्त केली जात असली तरी राजकारणात वावरणाऱ्यांनी पैसाच्या लोभापायी घरातील सुनेचा अमानुष छळ केला. घराबाहेर जनसेवेचा चेहरा घेऊन वावरणारी मंडळी पैशाच्या हव्यासापायी घरातील सुनेवर अत्याचार करत होते. या घटनेतून प्रेमविवाह करणाऱ्यांनीही बोध घेणे आवश्यक आहे. या घटनांना वेळीच आवर बसणे काळाची गरज आहे. आपण सधन असलो तरी मुलीला प्रेमापायी काय द्यावे, किती द्यावे यालाही बंधने घालणे आवश्यक असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे.



# शतायुषी हो बाळा..

## दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....

आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह

आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७


# गावकुसाच्या साहित्यातले तात्या आणि जीवन गौरव



श्री. साहेबराव नंदन (तात्या)

ताहाराबाद सारख्या सदन गावात मध्यमर्गिय साधारण कुटुंबातील साहेबराव नंदन उर्फ तात्या जेमतेम १० वी पर्यंत शिकले कुटुंबाला आधार म्हणून मिळेल ते काम करत होते पुर्वीच्या काळी गावगाड्याची करमणूक म्हणून अधुनमधून गंमती [ तमाशा ] नाटीका आयोजित केल्या जात असे गावातील हौशी कलाकार एकत्र येऊन हौशी नाटकं बसवायचे.त्या नाटकांचे गावोगावी गणेशोत्सवात सादरीकरण करायचे.त्या हौशी कलाकारांन पैकी एक अवलिया कलाकार साहेबराव तात्या !

ऐशीच्या दशकात खेड्यातील गावकुसाच्या बाराबलुतेदार समाजातील कलावंत शोधून, तात्या स्वतःच कथा पटकथा संवाद गीतरचना व कलावंत म्हणून स्वनिर्मित नाटकात भूमिका करत. त्यांच्या नाटकातून लोकरंजनातून लोक शिक्षण, मनोरंजनातून समाज प्रबोधन हमखास व्हायचेच. काळाच्या पडद्याआड गेलेली त्यांची नाटके आजही चर्चेचा विषय आहे. दारूने झिंगला संसार भंगला , शनिचा फेरा , मेहंदी रंगली रक्ताची, कुंकवाचा करंडा, इ. इ. तात्या वैवाहिक जिवना आधी त्यांनी पोटप्रपंचासाठी अनेकविध उद्योग केले. कधी पानशॉप कधी वाचनालय , बुक स्टॉल न्यूजपेपर एजंट , किराणा, बाजारहाट सर्वच करून पाहिले परंतू त्या काळी वर्तमान आयुष्यात यशाचे दाण पदरात कधी पडलेच नाही.

शेवटी रोजीरोटीच्या शोधात नाशिक ला आले अन् नाशिककर झाले. मिळेल ते काम केले, छोटा मोठा व्यवसाय ही केला.काही तरी वेगळं करायची धमक शांत बसू देत नव्हती. म्हणून थोडा काळ नाशिकमध्ये मोठ्या राजकीय पक्षात सहभागी झाले.... भा. ज. प सारख्या पक्षात स्थानिक कार्यालयात काम पाहीले पण तेथे मन रमले नाही.कारण तो पिंडच तात्यांचे नव्हता. धार्मिकवृती अंगी असल्याने प्रवचन ही केले. अँकरीग केले, आजही प्रवचन, कथाकथन करण्यात त्यांचा हातखंड आहे.

या जिवन प्रवासात कोरोनाचा काळ साहेबराव तात्यांसाठी आयुष्याला कलटणी देणारा ठरला.तेव्हा सर्वत्र संचारबंदी होती.गाव खेड्या पासून ते शहरा पर्यंत सर्वच नागरी वस्त्या ओस पडल्या होत्या एकदम ठुप !हाताला काम नाही, बाहेर पडायला वाव नाही. रिकाम्या वेळेचा सदुपयोग म्हणून तात्या आणि त्यांचे मित्र ललितभाऊ साळवे यांनी सगर समाजातील सामाजिक कार्यकर्ते , ज्ञानवंत, गुणवंत कतृत्ववान उच्चशिक्षित नव्हे नव्हे समाजभान ठेवत गावकुसाच्या गावगाड्यातले पुढारी काय राजकीय, सामाजिक, डॉक्टर वकील, शिक्षक इंजिनिअर, सनदी अधिकारी काय इ.विशेष प्रावीण्य मिळवलेल्या समाजबांधवांनची "जिवन गाथा" सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हॉटस् ऍपवर आपल्या लेखणीतून समाजापुढे "" सगर रत्न "" या लेखण मालिकेतून मांडले.त्यावेळी हे लेखण खुप लोकप्रिय झाले होते. समाज उत्सुकतेने पुढील सगर रत्न कोण असतील ? म्हणून वाट पाहत असत. येथेच तात्यासाहेबांन मधला लेखकाचा उदय झाला तो वयाच्या अठावन्नव्या वर्षी !परत मागे वळून पाहिले नाहीच.

एका मागे एक सरस कथा लघुकथा, अलक लिहिले ते समाजाच्या ग्रुपवर, साहित्य समुह, गावखेड्याच्या काळ्यामातीतील काटेकुट्यातील कधी अठराविश्व दारिद्र्य तर कधी सदन कुटुंबातील बायजाकाकू व तुकातात्या डोळ्यात पाणी येईपर्यंत रंगवले. पुढे पुस्तकं लिहिले प्रकाशित केले. त्यातील काही गाजलेले पुरस्कार प्राप्त साहित्य परिसस्पर्श चरित्र कादंबरी , गावगाडा काव्यसंग्रह, सगररत्न विशेषांक , सगरसेवार्थी अंक स्नेहबंध विशेषांक , सगर दीपोत्सव दिवाळी अंक. कथा,लघुकथा,अहिराणी साहित्य प्रसिद्ध आहे....अशा ह्या गरीब परिस्थितीच्या पण उच्च विचारांच्या लेखकाला अनेक पुरस्काराने अनेक संस्थांनी सन्मानित केले आहे आहे.एवढेच काय विविध साहित्य समुह ग्रुपचे शेकडो सत्मानपत्रे अनेक संस्थाचे मानाचे पुरस्कार त्यांच्या नावे आहेत.

आता वयाच्या बासष्टीत तीसरा जीवन गौरव पुरस्कार प्राप्त होत आहे. या आधी तात्यांना जळगाव, मुंबई नंतर आता नाशिकमध्ये. तोही छत्रपती संभाजी नगर येथील काळीज माझे साहित्य समुहाचा मानाचा तीसरा जीवन गौरव पुरस्कार आपल्या कर्मभूमीत, गोदातटी नाशिक नगरीत. खान्देशचे भूषण ताहाराबादचे आभूषण साहित्यातले शांत संयमी धीरगंभीर उदात्त विचारांच्या तात्यासाहेबांना आपल्या कर्मभूमीतील "जीवनगौरव" पाहून , तुकातात्या व बायजाकाकू [ काल्पनिक कथेतील ] स्वर्गातून आनंदाश्रूनी सन्मानित करतील यात शंकाच नाही.फक्त हे कौतुक पाहण्यासाठी, त्यांचे वडील स्वर्गीय आनंदराव आण्णा, आई विमलाई, बंधुतुल्य पाठीराखे कै. संभाजीराव पगारे उर्फ बापूसाहेब हवे होते.त्याची उणीव न भरणारी आहे.

पुनश्च अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

----------------------------------------

**लेखक**
**श्री. ज्ञानेश्वर खैरनार,**
**प्रसिद्धीप्रमुख,**
**सगर साहित्य वडेलकर.**
**ता. मालेगांव जि. नाशिक**

# प्रहारचा संताजी धनाजी व संत गाडगेबाबा सामाजिक सेवा पुरस्कार २०२५ दिपक जाधव यांना प्रदान

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



वासखेडे येथील प्रहार जनशक्ती पार्टी व प्रहार दिव्यांग क्रांती संघटना आयोजित संताजी धनाजी पुरस्कार वितरण सोहळा व विभागीय मेळावा नाशिक येथील रावसाहेब थोरात ऑडिटोरियम येथे राज्यमंत्री तथा दिव्यांग मंत्रालयाचे अध्यक्ष बच्चुभाऊ कडू यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या दिमाखात पार पडला. याबाबत अधिक माहिती अशी की २२ मे २०२५ रोजी नाशिक येथील रावसाहेब थोरात ऑडिटोरियम येते संताचे धनाजी पुरस्कार २०२५ व प्रहार संघटनेचा विभागीय मेळावा आयोजित करण्यात आला होता, यावेळी धुळे जिल्ह्यातील एका साक्री तालुक्यातील माळमाथा परिसरातील वासखेडी या गावाचे ग्रामीण भागात सामाजिक कार्याचा ठसा उमटविणारे व सामाजिक कामात सतत कार्यतत्पर् सामाजिक कार्य करणारे उपसरपंच तथा पत्रकार दीपक जाधव यांना संत गाडगेबाबा सामाजिक सेवा पुरस्कार २०२५ नाशिक विभागीय द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार,दिव्यांगाचे दैवत राज्य मंत्री तथा प्रहार संघटनेचे संस्थापकअध्यक्ष बच्चुभाऊ कडू यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, पत्र कारिता क्षेत्रातील असंख्य गोरगरिबाच्या न्याय हक्कासाठी सतत कार्यरत असलेले भरीव योगदान आहे, यापूर्वीही त्यांना महिला शक्ती संघटनेचा करोना योद्धा पुरस्कार, कोल्हापूर येथे पत्रकार क्षेत्रातील लोकराजा राजेषी शाहू महाराज गौरव पुरस्कार २०२३ विश्वगामी पत्रकार संघाचा आदर्श समाजसेवा पुरस्कार, निसर्ग मित्र समितीचा स्वामी विवेकानंद राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार २०२५ आदी पुरस्कारांनी देखील गौरविण्यात आले आहे, समाजातील विविध घटकांना न्याय हक्कासाठी सतत लढा देण्यासाठी कार्य तत्पर् सामाजिक कार्याचा हाच मोठा सिंहाचा वाटा व कुटुंबीयांची शिकवण हाच आदर्श समोर ठेवला आहे, यावेळी निरीक्षक कुणाल राऊत, महेश बडे, जाधव मॅडम,अँड, कविता पवार, धुळे जिल्हा अध्यक्ष आप्पासाहेब बोरसे, नाशिक प्रहार संघटनेचे ललित पवार, गणेश निंबाळकर, अनिल भडांगे साक्री तालुकाप्रमुख जयेश बावा, संजय अहिरराव, नाना शेलार, प्रहार शेतकरी संघटनेचे गणेश राजपूत, योगेश जाधव, शशिकांत अहिरराव, प्रदीप सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते रोहितकुवर, आदी यावेळी उपस्थित होते, दीपक जाधव यांच्यावर विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

# महसूलमंत्र्यांच्या धडाडीच्या निर्णयांमुळेच शिवपाणंद चळवळीला मोठे यश

## महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यभरातील शेतकऱ्यांची मने जिंकली

## श्री शरद पवळे/ श्री जंगले पाटील( महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळ)

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------

दर्जेदार शासणनिर्णयासाठी चळवळीचा राज्य सरकारकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा. ब्रिटीशकालीन शिव पाणंद शंतरस्त्यांसाठी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे व महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे राज्य समन्वयक श्री जंगले पाटील यांनी शेत तिथे रस्ता व गाव तिथे समृद्धी अभियानाच्या माध्यमातून राज्यभर जनजागृती करत राज्यव्यापी चळवळ उभी करून ग्राम प्रशासन, तालुका प्रशासन, जिल्हा प्रशासन, राज्यप्रशासन यांना निवेदन देत वेगवेगळया आंदोलनाच्या माध्यमातून राज्यातील शेतरस्त्यांच्या ज्वलंत प्रश्नासाठी सरकार प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा करत राज्यात



ऐतिहासिक लढा उभारला या लढ्याची राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दखल घेत चळवळीच्या पदाधिकाऱ्यांसोबत मंत्रालय मुंबई येथे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेवुन तातडीने राज्यात शेतरस्त्यांच्या संदर्भातीत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांमार्फत तातडीने कार्यवाही सुरु केली राज्यातील शेतरस्त्यांसाठी निशुल्क पोलिस संरक्षण, शेतरस्त्यांची अधिकृतपणे ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्कात नोंद घेण्यासह इतर पोटहीस्याठी मोजणी शुल्क कमी (२०० रु.) करण्यात आले, आकारी पड म्हणून घोषीत झालेल्या जमिनी शेतकऱ्यांसह वारसांना चालु वर्षाच्या प्रचलित बाजार मुल्याच्या ५% शासणास जमा केल्यास शेतकऱ्यांना हस्तांतराचा अधिकार, डिजिटल भूमि अभिलेख आधुनिकीकरण ई-महाभूमि अंतर्गत संगणीकृत डिजीटल स्वाक्षरीने ७/१२,८-अ उपलब्ध होणार असे महत्वाचे निर्णय घेण्यात आल्यामुळे शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे व राज्य समन्वयक श्री जंगले पाटील यांनी राज्याचे कार्यसम्राट महसुलमंत्री चंदशेखर बावनकुळे यांची मुंबईत भेट घेवुन धन्यवाद व्यक्त करत सन्मान केला यावेळी राज्यात सरसकट शेतरस्त्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी चळवळीच्या मागणी प्रमाणे लवकरच शेतरस्त्यांना हद्द निश्चितीसाठी दगडी नंबरी लावणे, शेतरस्त्यांना नंबरींग करणे, राज्यातील तहसिलदारांना रोड मॉडेल तालुका पुरस्कार, तहसिल कार्यालयात रस्ता अदालत घेण्याच्या मागण्या शासन निर्णयात घेण्याचे आश्वासन महसुलमंत्र्यांनी चळवळीच्या पदाधिकाऱ्यांना दिले यावेळी महसुलचे मुख्य सचिव प्रवीण महाजन,महसुलचे राहुल गांगुर्डे आदी उपस्थित होते यावेळी विशेष कार्यकारी अधिकारी सचिन ढोले यांचे मोलाचे योगदान लाभले.

# भारतीय सैन्याच्या पराक्रमाला सलाम! तिरंगा यात्रेला देगलुर शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
----------------------

पहलगाम येथे झालेल्या निर्दयी दहशतवादी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देत 'ऑपरेशन सिंदूर' च्या माध्यमातून भारतीय जवानांनी शत्रूंना धडा शिकवला. या दैदिप्यमान कामगिरीबद्दल



कृतज्ञता आणि अभिमान व्यक्त करण्यासाठी देगलुर शहरात भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले. या यात्रेद्वारे भारताच्या वीर सैनिकांचे आभार व्यक्त करण्यासाठी विद्यार्थी, महिला, देशभक्त नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# नाशिक येथे माजी राज्यमंत्री बच्चु कडू यांच्या हस्ते संताजी धनाजी कार्यकर्ता सन्मान पुरस्कार सोहळा संपन्न

शैलेश रौंदळ
नाशीक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------

प्रहार जनशक्ती पक्ष व प्रहार दिव्यांग संघटनेचे वतीने संताजी धनाजी पुरस्कार वितरण सोहळा के. टी. एम. एच. कॉलेज, रावसाहेब थोरात ऑडिटोरियम, नाशिक येथे माजी राज्यमंत्री ना. बच्चु कडू यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. सरकार ने ठराविक बड्या उद्योजकांना दीड लाख कोटींचे कर्ज माफ केले परंतु शेतकरयांना कर्जमाफी साठी टाळाटाळ होत असुन कर्ज माफी न केल्यास आंदोलनाची धार आधिक तीव्र करण्यात येईल, असे बच्चु कडूंनी भाषणात बोलताना सांगितले, रावसाहेब थोरात सभागृहात कार्यकर्तेना संताजी धनाजी पुरस्कार बच्चू कडु यांच्या हस्ते वितरीत करण्यात आला, कृषी मंत्र्यांचे कार्यपध्दती वर ही त्यांनी टिकास्त्र सोडले, दिव्यांगांना हात पाय नाहीत अशा दिव्यांगांना केवळ १५०० रुपये देतात व आमदार मंत्रींचा पगार ५५००० वरुन साडेतीन लाख केला दिव्यांगांना दरमहा सहा हजार











रुपये अनुदान देण्यात यावे. प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्न संदर्भात लवकरच मंत्रालय स्तरावर बैठक आयोजित करण्यात येईल असे ही बच्चु कडू म्हणाले. यावेळी दिव्यांग विजय पाटील यांनी देशभक्ती गीता वर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या प्रसंगी निरीक्षक महेश बढे, निलेश वाटाणे, कुणाल राऊत उपस्थित होते.

पुरस्कारार्थी - पार्श्वनाथ जाधव, संदीप सूर्यवंशी, धर्मराज पाटील, स्वाती कुमावत, समाधान बागल, हरीश कुमावत, राजेंद्र पवार, संतोष मानकर, निंबा अहिरे, प्रमोद पाटील, महेंद्र सपकाळे, मंगलचंद जैन, तुकाराम अलट, दीपक जाधव, गोपाल गावित यांचा सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी उपस्थित नाशिक जिल्हाप्रमुख अनिल भडांगे, जिल्हाध्यक्ष गणेश निंबाळकर, दिव्यांग जिल्हाध्यक्ष ललित पवार, चंद्रभान गांगुर्डे, सविता जाधव, बबलू मिर्झा, समाधान बागल, अमजद पठाण, नितीन गव्हाने, अमोल अडांगळे, शाहनवाज शेख, संजय तिवडे, नाना शिंदे, अनंता उपाध्ये, शाम गोसावी, शरद शिंदे, दत्तु बोडके, विलास कानकाट, दत्ता कांगणे रविंद्र टिळे, आरुण पाचोरे, अमोल फडताळे, तुषार खैरनार आदी उपस्थित होते.

# मुक्त पत्रकारांना दरमहा ₹१०,००० पेन्शन द्यावी – राष्ट्रवादी कामगार युनियनची मागणी

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------

राज्यातील मुक्त, ई-पेपर आणि वेब पोर्टलवर कार्यरत पत्रकारांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असून, सरकारने त्यांना दरमहा ₹१०,००० पेन्शन द्यावी, अशी जोरदार मागणी अखिल महाराष्ट्र राष्ट्रवादी जनरल कामगार युनियनचे महाराष्ट्र अध्यक्ष सुभाष देसाई यांनी केली आहे.

मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत देसाई बोलत होते. यावेळी युनियनची नवी कार्यकारिणीही जाहीर करण्यात आली. यात





रमेश औताडे (अध्यक्ष), नरेंद्र घोलप (उपाध्यक्ष), शिरीष वानखेडे (महासचिव), सुरेश गायकवाड (सचिव), अल्पेश म्हात्रे (संघटक चिटणीस), तसेच सदस्य म्हणून सुरेश ढेरे व सुबोध शाक्यरत्न यांचा समावेश आहे.

देसाई म्हणाले, " अनेक अनुभवी, सुशिक्षित पत्रकार सध्या स्वतंत्र स्वरूपात काम करत आहेत. त्यांना ना नियमित नोकऱ्या मिळतात ना कंत्राटी संधी. त्यामुळे अनेकांना वेब पोर्टलसाठी लेखन करून अत्यल्प मानधनावर समाधान मानावे लागत आहे."

"या पत्रकारांना फक्त ₹५०० ते ₹१, ००० पर्यंतच मानधन मिळते, जे त्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्यास अपुरे आहे. त्यामुळे अनेकजण कर्जबाजारी झाले असून, मानसिक तणावात आहेत," असे त्यांनी सांगितले.

देसाई यांनी पुढे सांगितले की, सरकार जसे सुशिक्षित बेरोजगारांना ₹४,००० भत्ता देते, त्याच धर्तीवर मुक्त पत्रकारांना ₹१०, ००० पेन्शन मिळावी. तसेच बांधकाम कामगार, घरेलू कामगार व कंत्राटी कामगारांना ज्या सुविधा मिळतात, त्या पत्रकारांनाही लागू कराव्यात, अशी मागणीही त्यांनी केली.

"सरकारने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे आणि लवकर निर्णय घ्यावा," असे आवाहनही देसाई यांनी शेवटी केले.

# कबीर साहेब 628 वा प्रकट दिनानिमित्त महासमागमाचे आयोजन

पल्लवी शेलार
श्रीगोंदा तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------

सतलोक आश्रम, ढवळपुरी (अहिल्यानगर, महाराष्ट्र) येथे जगतगुरू तत्त्वदर्शी संत रामपाल जी महाराज यांच्या सानिध्यात परमेश्वर कबीर साहेब यांचा ६२८ वा प्रकट दिवस साजरा करण्यासाठी ०९, १० व ११ जून २०२५ रोजी भव्य तीन दिवसीय महासमागमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात अखंड पाठ, भव्य सत्संग, आध्यात्मिक प्रदर्शनी, नि:शुल्क नाम दीक्षा, हुंडा मुक्त विवाह सोहळा, व विशाल भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. संत रामपाल जी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली समाज सुधारण्याचे व मोक्ष प्राप्तीचे कार्य मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्यांच्या मुख्य उद्दिष्टांमध्ये भ्रष्टाचार निर्मूलन, जातीपातीचा भेद नष्ट करणे, व्यसनमुक्त समाज निर्माण करणे, युवकांमध्ये नैतिक व आध्यात्मिक जागृती आणणे, व हुंडा पद्धतीचे निर्मूलन करणे यांचा समावेश आहे. या कार्यामार्फत समाजात शांतता, बंधुभाव व समत्व प्रस्थापित होत आहे. कार्यक्रमात सहभागी भाविक भक्तांसाठी लाडू, पुरी, जिलेबी, भात, डाळ आदींचा समावेश असलेल्या नि:शुल्क भंडाऱ्याची व्यवस्था करण्यात आली आहे. असे अनेक प्रकारचे भंडाऱ्यात पक्वान्ने बनवले जाणार आहेत.यात देशभरातून लाखो भक्त सहभागी होणार असून त्यांच्यासाठी सर्व सुविधा विनामूल्य पुरवल्या जाणार आहेत. या पवित्र प्रसंगी संत रामपाल जी महाराज यांच्याकडून मोफत नाम दीक्षा घेऊन आपले जीवन आध्यात्मिक मार्गावर अग्रसर करावे. असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आलेले आहे.

# करिअर कट्टा आणि कर्म.आ.मा.पाटील वरिष्ठ महाविद्यालयात सामंजस्य करार

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------------

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने कार्यक्रम घेण्यात आला. धुळे येथे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या करिअर कट्टा आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परीक्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये सामंजस्य करार ( MOU ) करण्यात आला. यानिमित्त धुळे येथील शिवाजी शिक्षण संस्थेचे डॉ .पी.आर.घोगरे विज्ञान महाविद्यालयात विभागीय स्तरावरील प्रत्येक महाविद्यालयाचे प्राचार्य, करिअर कट्टा समन्वयक, आक्यूएसी समन्वयक यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी धुळे येथील डॉ. पी.आर.घोगरे विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्ही.पाटील यांनी या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविले.



या सामंजस्य कराराची प्रक्रिया महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष मा. यशवंत शितोळे, धुळे विभागीय प्रचार्य प्रवर्तक डॉ.आर.आर. अहिरे, जळगाव विभागीय प्राचार्य प्रवर्तक डॉ.भारंबे ( जळगाव), माजी प्राचार्य डॉ.मनोहर पाटील, प्राचार्य डॉ.प्रवीणसिंह गिरासे, धुळे जिल्हा करियर कट्टा समन्वयक प्रा.डॉ .संभाजी पाटील,विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, महाविद्यालयीन समन्वयक, महाविद्यालयांचे आयक्यूएसी समन्वयक, आदीं प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली.

राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषद (NAAC) च्या मार्गदर्शक सूचनानुसार महाविद्यालयांना आवश्यक असलेला हा सामंजस्य करार करिअर कट्ट्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन आणि कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. त्यासाठी कर्म.आ.मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालयानेही यामध्ये सहभाग घेतला आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.एल.बी.पवार व करिअर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक प्रा.डॉ. सतीश मस्के यांच्याकडे करिअर कट्टा सामंजस्य करारा बाबत कागदपत्रे देऊन करार पूर्ण करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राचे अध्यक्ष मा. यशवंत शितोळे एस एस व्ही पी एस विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्ही.पाटील, जळगाव च्या एम.जे.कॉलेज चे प्राचार्य डॉ.एन. बी.भारंबे, एस एस व्ही पी एस कला महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ.मनोहर पाटील, साक्रीच्या सी.गो.पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे, नरडाणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गिरासे, धुळे येथील प्रा.डॉ.संभाजी पाटील आदी मान्यवरांच्या उपस्थितीत करार पत्र सुपुर्द करण्यात आले. धुळे येथील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कांचन चौधरी यांनी केले. आभार प्रा.डॉ.संभाजी पाटील यांनी मानले.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# सावधान!डोनाल्ड ट्रम्प विश्वासघाती झाले असून; जगातील मित्र राष्ट्रांना केव्हाही धोका देवू शकतात

अमेरिका सध्याच्या परिस्थितीत स्वार्थी बनल्याने दिसून येते.अमेरिकेने युक्रेन, अफगाणिस्तान सारख्या अनेक राष्ट्रांना लहुलोहान करून सोडले आहे व त्यांची मदत करण्याचे सोडून त्यांना धोका देण्याचे काम करीत आहे आणि हेच काम व्यापार आणि टेरिफच्या बाबतीतही करीत आहे.त्याचप्रमाणे पाकिस्तानच्या बाबतीत भारताला धोका देवून सध्याच्या परिस्थितीत डोनाल्ड ट्रम्प पाकिस्तानला सर्वोतोपरी मदत करून संपूर्ण लाड पुरवित आहे व आतंकवाद्यांना मागच्या दरवाजाने खतपाणी घालत असल्याचे दिसून येते.म्हणजेच अमेरिका बोलतो एक आणि करतो वेगळेच त्यामुळे अमेरिकेपासुन भारताला सावध रहाने गरजेचे आहे.२२ एप्रिल २०२५ ला पहलगाममध्ये पर्यटकांवर आतंकवाद्यांनी हल्ला करून २८ निरअपराधांची हत्या केली होती.त्याचा बदला भारताने मोठ्या शिताफीने घेतला व पाकिस्तानमध्ये घुसून आतंकवाद्यांचे ९ कॅम्प उध्वस्त केली व शेकडो आतंकवाद्यांचा सफाया केला सोबतच अनेक पाकिस्तानी सैनिक सुध्दा मारल्या गेलेत.आतंवाद विरोधी भारताची कठोर भुमिका पहाता पाकिस्तानने शेकडो मिसाईल भारतावर डागण्याचा प्रयत्न केला.परंतु पाकिस्तानचे संपूर्ण मिसाईल भारतीय सेनेने निष्क्रिय करून त्याची औकात त्याला दाखवली.पाकिस्तानची मिसाईल कारवाई पहाता भारताने सुध्दा पलटवार केला व पाकिस्तानमध्ये १०० किलोमीटर अंदर घुसून पाकिस्तानचे एअर बेससह अनेक ठिकाणे उध्वस्त करून अनेक आतंकवादी ठीकाणे जमीनदोस्त केले.भारताची कठोर कारवाई पहाता पाकिस्तान आपोआप घुटण्यावर आला व युद्ध बंदीची भिक डोनाल्ड ट्रम्पच्या माध्यमातून भारताला मागायला लागला व भारताने आपल्या शर्तीवर युद्ध विराम केले आणि खडसावून सांगितले की यानंतर आतंकवाद्यांकडुन एकजरी गोळी चालली तर भारताकडून आगीचे गोळे टाकण्यात येईल.भारताने पाकिस्तान, अमेरिकासह जगाला स्पष्ट शब्दात ठनकाऊन सांगितले की जोपर्यंत आतंकवाद खत्म होत नाही तोपर्यंत ऑपरेशन सिन्दुर सुरूच राहील.परंतु ज्या पाकिस्तानमध्ये आतंकवाद्यांची फॅक्टरी आहे व अमेरिकेवर हल्ला करणारा मास्टर माईंड ओसामा बिन लादेन याने अमेरिकेला वर्ल्ड ट्रेड सेंटर सारख्या मोठ्या जखमा देवुन आगीत लोटले होते व यात ३ हजारपेक्षा अधिक लोकांचा बळी गेला होता.नंतर अमेरिकेने ओसामा बिन लादेनला पाकिस्तानमध्ये घुसून मारले होते.एवढे सर्व असतांना आज अमेरिका पाकिस्तानचे गुण गातो व सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन सुध्दा देत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.अमेरिका नेहमी प्रमाणे आताही दोगली नितीचा वापर करीत आहे.भारत-पाक संघर्ष सुरू असतांनाच आय.एम. एफ.ने पाकिस्तानला ताबडतोब १ अरब अमेरिकन डॉलरची मदत केली आणि हे कर्ज देण्याचे काम अमेरिकेच्याच मदतीने झाले आहे.आय.एम.एफ.चे पुर्वीचे कर्ज अजुनपर्यंत पाकिस्तानने चुकविले नाही तरीही त्याला कर्ज देण्यात आले यावर भारत सरकारने नाराजी सुध्दा व्यक्त केली आहे.कारण पाकिस्तानला मिळणारे ८० टक्के कर्जाचा पैसा हा आतंकवादी संघटनांना दिला जाणार आहे.आज भारताची सैन्य शक्ती, ब्रम्होस सारखे अत्याधुनिक मिसाईल पाहून अमेरिका,चीन व तुर्की तिलमिला झाल्याचे दिसून येते.अशा परिस्थितीत भारताची जगात वाढती ताकद पहाता पाकिस्तानच्या मदतीला अमेरिका, तुर्की व चीन खुलेआम उभा असल्याचे दिसून.त्यामुळे आज अमेरिका विश्वास पात्र देश रहाला नसुन एक गद्दार देश बनला आहे.तुर्कीतील भुकंप काळात भारत सर्वप्रथम धावुन गेला व सर्वोतोपरी मदत सुध्दा केली परंतु आज तुर्की सुध्दा पाकिस्तानच्या बाजूने आहे.त्यामुळेच भारतीयांनी तुर्कस्तानच्या पर्यटनावर बहिष्कार टाकला आहे जेणेकरून त्याची औकात त्याला समजायला हवी.आपला खरा मित्र व विश्वास पात्र देश म्हणजे फक्त रशिया हेही तितकेच सत्य आहे.गेल्या ७८ वर्षांचा इतिहास आहे की अमेरिकेने भारतापेक्षा पाकिस्तानलाच सर्वोतोपरी मदत केली आहे.त्यामुळे भारताने डोनाल्ड ट्रम्प पासून सावध राहने अत्यंत गरजेचे आहे.पाकिस्तान हा आतंकिस्तान आहे त्यामुळे त्याची प्रगती तर होऊच शकत नाही.उलट त्याचे अनेक तुकडे-तुकडे होण्याची दाट शक्यता आहे.ज्याप्रमाणे पाकिस्तानपासुन बांगलादेश वेगळा झाला.त्याच धर्तीवर आज पाकिस्तानमधील अनेक प्रांत पाकिस्तान सोबत रहाण्यास तयार नाहीत. सध्याच्या परिस्थितीत सिंध प्रांत व व बलुचिस्तान उठावाच्या दिशेने वाटचाल करीत आणि हे दोन्ही प्रांत पाकिस्तानसाठी बाभळीचे काटे बनणार आहे ही बाभळीचे काटे पाकिस्तानला एवढ्या जखमा देवुन जाईल की तो मरेपर्यंत कधीच विसरणार नाही "जैसी करणी वैसी भरणी"हेही तितकेच सत्य आहे. सध्याच्या परिस्थितीत पाकिस्तानमध्ये गृहयुद्ध भडकल्याचे दिसून येते आणि त्याचे चित्र सिंध प्रांतात पहायला मिळत आहे.पाकीस्तानमध्ये गृहमंत्र्याचे घर जाळले, महामार्गावर मोठ्या प्रमाणात लुटपाट सुरू आहे, सिंधू कालवा प्रकल्पावरून आंदोलन हिंसक झाले आहे,या संघर्षात दोघांचा मृत्यू झाला असून पोलिसांसह अनेक जण जखमी झाले आहेत.संतप्त आंदोलक बिनधास्त अत्याधुनिक बंदुकांसह रस्त्यावर उतरले आहेत.त्यामुळे ही संपूर्ण परिस्थिती पाकिस्तानच्या आवाक्या बाहेर जातांना दिसत आहे.तर दुसरीकडे पाकिस्तानच्या अशांत बलुचिस्तान प्रांतात स्कूल बसवर करण्यात आलेल्या आत्मघातकी हल्ल्यात तीन बालकांसह पाच जणांचा मृत्यू झाला व ३८ जण जखमी झाले.अशा पाकिस्तानमध्ये त्यांचेच बंधू आतंकवादी कारवाया करीत आहे तर दुसरीकडे पाकिस्तानची जणता पाकिस्तान सरकारला त्रासल्यामुळे मोठा उठाव करण्याच्या तयारीत आहे.म्हणजेच पाकिस्तान जेवढे पाप करीत आहे त्याच्या दुप्पट त्याला यातना सुध्दा भोगाव्या लागत आहे.अशा परिस्थितीत अमेरिकेने जर पाकिस्तानला मदत केली तर कालांतराने अमेरिका "न घरका ना घाट का"अशी परिस्थिती येवू शकते.भारतात ज्योती मल्होत्रा सारखे अनेक गद्दार आहेत ते पाकिस्तानसाठी जासुसी व हेरगिरी करीत आहेत.अशाच्या मुसक्या सरकारने ताबडतोब आवळल्या पाहिजे व यांना कठोर शिक्षा ठोठावली पाहिजे.इतिहास सांगतो आपल्या घरात कोणी ना कोणी गद्दार असतो यालाच म्हणतात "घर का भेदी लंका ढाये" आणि यामुळेच पहलगाम हत्याकांड झालेला आहे. त्यामुळे ज्योती मल्होत्रा सारखे अनेक राहु शकतात की ते पाकिस्तानसाठी हेरगिरी करीत असतील अशांना सुरक्षा विभाग जागीच ठेचले पाहिजे.त्याचप्रमाणे राजकीय पुढाऱ्यांनो लक्षात ठेवा ऑपरेशन सिन्दुर देशाच्या सुरक्षिततेचा प्रश्न आहे त्यामुळे यावर कोणत्याही प्रकारचे राजकारण होणार नाही याची जातीने काळजी घ्यावी आणि हेरगिरी किंवा अन्य गद्दारांना सजा देण्यासाठी सहकार्य करावे.कारण गद्दारांना माफी नकोच.भारतीय सेनेला माझा कोटी-कोटी सलाम जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**नागपूर.**

# रक्षा खडसे-रोहिणी खडसे कोथळीत संत मुक्ताई अंतर्धान समाधी सोहळ्यात एकत्र

संदीप पाटील
जळगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------



आदिशक्ती संत मुक्ताबाई यांचा ७२८ वा अंतर्धान सोहळा श्रीक्षेत्र कोथळी (ता.मुक्ताईनगर) येथे गुरूवारी पार पडला. त्यात कोथळी गावाचे मूळ रहिवासी असलेल्या खडसे परिवाराचाही सक्रीय सहभाग होता. भाजपच्या केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे व राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे या नणंद-भावजयने राजकीय मतभेद बाजूला ठेवून पांडुरंगाच्या पालखी मिरवणुकीचे निवासस्थानी एकत्रच स्वागत केले. महाराष्ट्रातील आपेगावात जन्मलेल्या संत मुक्ताबाई या जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुक्यात कोथळी येथे अंतर्धान पावल्याची आख्यायिका आहे. त्यानुसार, दरवर्षी कोथळीत वैशाख कृष्ण पक्षात संत मुक्ताबाई अंतर्धान समाधी सोहळा पार पाडला जातो. त्यासाठी खास पंढरपूरहून तसेच राज्याच्या इतर ठिकाणाहून सजविलेल्या पालख्या कोथळीत टाळ व मृदंगाच्या गजरात दाखल होतात. यंदाही संत मुक्ताबाईंच्या ७२८ व्या अंतर्धान सोहळ्या निमित्त श्रीक्षेत्र कोथळीत गुरूवारी सकाळपासूनच भक्तीमय वातावरण होते. आपल्या सक्रीय राजकारणाची सुरूवात कोथळी गावापासून करणाऱ्या खडसे परिवारातील रक्षा खडसे व रोहिणी खडसे यांनीही त्यात सहभागी होऊन आपले योगदान दिले. ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांच्या स्नुषा तथा भाजपच्या केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्यासह कन्या शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी सकाळीच कोथळीतील मूळ मंदिरावर जाऊन संत मुक्ताबाईंच्या मूर्तीचे दर्शन घेतले. त्यानंतर दोघींनी अंतर्धान समाधी सोहळ्याच्या निमित्ताने मूळ मंदिर ते नवीन मंदिर दरम्यान काढण्यात आलेल्या पांडुरंग पालखी मिरवणुकीचे कोथळी गावातील आपल्या निवासस्थानी स्वागत केले. याशिवाय, पालखीत सहभागी झालेले संत, कीर्तनकार व वारकरी मंडळींच्या अल्पोपहाराची व्यवस्था केली.

## वाचकांच्या लेखणीतून

# सत्कार- निसर्ग मातेचा

वसुंधरा, आकाशाच्या निळ्या मंडपात मस्त बसली होती !
कारण, मोकळ्या बागेत तिचा सत्कार होणार होता -
अगोदरच, रंगीबिरंगी फुले रांगेत उपस्थित होती -
पाने कडेलाच गर्दी करून उभी राहिली होती .
पृथ्वीने मात्र हिरवी-गार शाल हाती धरली होती..
ओढ्याच्या खळखळणाऱ्या पाण्याने ताल धरला होता ;
भुंग्यांनी तिच्या गळ्यात गुलाबाचा हार घातला होता!
सुंदरतेचा आसमानी नजारा नैनी भरत चालला होता ;
नजरेच्या वेलीने तिच्या अंगाला वेढा टाकला होता..
शेजारी बसायला ती आकाशातील चांदण्यांना खुणावत होती !
अंधाराला हळूच ती पाठीमागे कोपऱ्यात सारत होती .
काजव्यांनी मात्र उगाचच प्रकाशाचा प्रयत्न केला होता !
वाऱ्याने मात्र नुसताच गोंगाट करायला नको होता?
चक्रीवादळाने भरपूर धुळीचा आहेर आणला होता .
ढग , काळे पांढरे वस्त्रात किती नटला होता?

डोंगरांनी गोल रिंगण करून फेरा मारला होता .
पाण्याच्या थेंबांनी हवेत गारवा निर्माण केला होता .
क्षणात विजांनी फटाक्यांचा बार उडवून दिला होता..
पावसाच्या संतच धारा आनंदात बरसत होत्या..
पाण्याला त्या नुसत्या खोलवर भरवत होत्या -
नदीला सुद्धा येण्याचे आमंत्रण त्या देत होत्या -
प्रमुख पाहुणा सागराकडे मात्र त्या झेपावत होत्या..
निसर्गाने सगळ्यांनाच सबुरीचा सल्ला दिला होता !
विशेष करून तो मानवाच्या सुरक्षेचा इशारा होता !
वृक्षतोड नको, हा कायद्याच जणू तो सांगत होता !
सत्कार मात्र निसर्ग मातेचा वारंवार होतच होता..

**काव्य लेखन -**
**बबन नाना सोनवणे**
**मु. पो.निघोज. ता. पारनेर.**
**जि. अहिल्यानगर**



# शासकीय विश्रामगृहाच्या एका खोलीत हा पैसा आला कुठून? आणि तो कुणी आणला?

## पोलीस प्रशासन राजकीय दबाव झुगारण्याची ताकद दाखवेल का? सत्य बाहेर यायला हवे!

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------------



धुळे व नंदुरबार जिल्हयाच्या अभ्यास दौर्यावर आलेल्या आमदारांच्या समितीतील सदस्यांना देण्यासाठी धुळे शासकीय गुलमोहर विश्रामगृहातील खोली क्रमांक १०२ मध्ये साडेपाच कोटी रुपये ठेवल्याचा खळबळजनक आरोप धुळे शहराचे माजी आमदार व उबाठा शिवसेनेचे नेते अनिल गोटे यांनी केला आणि तब्बल दहा तास याठिकाणी ठिय्या आंदोलन करत या प्रकरणाची चौकशी करण्यास पोलीस प्रशासनास भाग पाडले.

माजी आमदार अनिल गोटे यांनी या प्रकरणात केवळ-आरोप केला नाही तर त्यांनी आपल्या कार्यकर्त्यासह विश्रामगृहात खोली नंबर १०२ समोर ठिय्या मांडला. कारण आ. गोटे हे अभ्यासू नेते आहेत. त्यांना कायद्याचे ज्ञान आहे. महाराष्ट्र विधानमंडळाच्या अंदाज समितीत असलेली आमदाराची संख्या आणि त्यांचेवर आरोप करणे ही साधारण बाब नाही.मा.आ. अनलि गोटे हे स्वतः तीन वेळा या राज्याच्या विधानसभेत धुळयाचे लोकप्रतिनिधी होते. त्यामुळे त्यांच्या आरोपांमध्ये असलेले तथ्य तपासून पाहण्याची आवश्यकता आहे. विशेष म्हणजे या खोलीत पैसे ठेवले आहेत असा नूसता आरोप त्यांनी केला नाही, तर त्या ठिकाणी जावून ठिय्या मांडत प्रशासनातील पोलीस अधिकार्यांना, महसूल विभागाला ॲन्टी करप्शन विभागाला त्यांनी माहिती देवून या खोलीची तपासणी करण्याची मागणी केली. आणि तब्बल पाच ते सहा तासानंतर शासकीय यंत्रणा जागी झाली. त्यानंतर गुलमोहर विश्रामगृहाची खोली क्रमांक १०२ चे कुलूप इन कॅमेरा प्रांताधिकारी, अप्पर तहसीलदार, अप्पर पोलीस अधिक्षक, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता, आणि पंच यांच्या उपस्थितीत उघडण्यात आले. आणि धक्कादायक बाब म्हणजे आ. गोटे यांनी केलेल्या आरोपानूसार या खोलीत अलिबाबाच्या गुहेप्रमाणे नोटांचे 'घबाड' विश्रामगृहाच्या या खोलीत सापडले. आता प्रश्न असा आहे की शासकीय विश्राम गृहाच्या एका खोलीत हा पैसा आला कुठून ? आणि तो कुणी आणला? कोणाच्या आदेशाने हा पैसा शासकीय विश्राम गृहात आला ? या सर्व घटनाक्रमाचा सूत्रधार कोण? याचा शोध घेणे हे पोलीस प्रशासनाचे काम आहे. परंतू पोलीस प्रशासनात राजकीय दबाव झुगारण्याची ताकद असलेले अधिकारी आता दुर्मिळ होत चालेले आहेत. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे संरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात किती राजकीय हस्तक्षेप होता ते संपूर्ण राज्याने पाहिले. असं म्हणतात की 'पापाचा घडा' भरला की पाप्याला देवसुध्दा वाचवू शकत नाही. वाल्मीक कराडने किती लोकांना मारुन राखेत दफन केले हा शोध घेण्याचा भाग आहे. परंतू संरपच संतोष देशमुख यांची हत्या ही 'शंभरावे पाप' असावे आणि म्हणून त्याला कारागृहाच्या सलाखा मोजव्या लागल्या. वाल्मीक कराड हे साधे प्रस्थ नाही. नूसता आवाज दिला तरी एक हजार हत्यारबंद गुंड हजर व्हायचे. परंतू आज वाल्मीक कराड कारागृहात आहे आणि त्याचा 'आका' मत्रीमंडळातून बाहेर. प्रश्न असा आहे की पोलीस प्रशासन हे अलिकडच्या काळात राजकीय गुलामगिरीत का वावरते? या राज्यातील दहा पोलीस अधिक्षकांनी सुध्दा 'अंतरात्मा की आवाज' ऐकून किमान अशा प्रकरणांमध्ये, जिथे अन्याय आहे, अत्याचार आहे बदमाशी आहे आणि सामान्य माणसाला न्याय देण्याचा प्रश्न आहे अशा प्रश्नांमध्ये तरी कुणालाही न जुमानता कार्यवाही केली तरी 'सत्य' समोर येईल. परंतू पीआयच्या वरीती पोलीस अधिक्षक आहेत, त्यांचेवर आयजी आहेत आणि त्यांचेवर गृहखाते आहे. आणि म्हणून पुणे येथील पोर्शे कार अपघात प्रकरण असेल, किंवा सीने अभिनेता शाहरुक खानच्या मुलाचे 'ड्रग्ज' प्रकरण असेल,किवा सिने अभिनेता सुंशातसिंग राजपूत आत्महत्या प्रकरण असेल अशा अनेक मोठया प्रकरणांमधील 'सत्य' कधीही बाहेर येत नाही. कारण यामध्ये राजकीय दबाब आणि पोलीस प्रशासनातील 'राजकीय गुलामगिरी' ही कार्यरत असते. नुकतेच मध्यप्रदेशातील मंत्री विजय शाह यांनी कर्नल सोफिया कुरेशी यांचेसंदर्भात बेताल वक्तव्य केले, परंतू मध्यप्रदेश उच्च न्यायालयाने त्याची स्वतः दखल घेत पोलीसांना गुन्हा दाखल करण्यास भाग पाडले. राजकीय दबाव एव्हढा की या एफआयआरमध्ये सुध्दा पोलीसांनी मंत्र्याचे विरोधात तकलादू शब्दरचना करत गुन्हा नोंदविला.आणि हा एफआयआर आणि माफीनामा सुध्दा सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावला. प्रश्न शेवटी तोच आहे की धुळे शासकीय विश्राम गृहात ठेवलेल्या पैशांच्या प्रकरणात "खोदा पहाड निकला चुहा" असे न घडता "खोदा पहाड निकला घबाड" असे झाले असतांना सुध्दा अद्यापही एफआयआर दाखल करण्यात आला नाही. अज्ञाताविरोधात का असेना परंतू एफआयआर दाखल व्हायला हवा होता. कारण जो आरोप केला त्यात तथ्य आढळले आहे. या खोलीत तब्बल १ कोटी ८४ लाख ८४ हजार २०० रुपये एव्हढी मोठी रक्कम सापडली आहे. ही रक्कम नेमकी कुठून आली, कोणी आणली, कशासाठी आणली, कुणासाठी आणली या प्रश्नांचे उत्तर शोधण्यासाठी तरी गुन्हा दाखल होण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात जर पोलीस प्रशासन गुन्हा दाखल करत नसेल तर आयकर विभागाने तरी याची दखल घ्यावी, किंवा सामाजिक क्षेत्रात काम करणार्या संस्थांनी न्यायालयात धाव घेणे जनहिताचे आहे. किंवा न्यायालयाने स्वतः या घटनेची गंभिर दखल घ्यावी, अशा प्रकरणाच्या चर्चांना आता उधाण आले आहे. सामान्य नागरिकांच्या दृष्टीने मात्र एकच प्रश्न समोर येतो आहे, तो हा की या प्रकरणात जे सत्य असेल ते तपासातून बाहेर यायला हवे. गेल्या आठवडा भरापासून सदर खोली ही सार्वजनिक बांधकाम विभागाने कुणाला दिली होती, त्या ठिकाणी १५ तारखेपासून कोण वास्तव्यास होते, त्याची चौकशी झाली पाहिजे, अशी जनभावना आहे. अर्थात या प्रकरणात मुख्यमंत्र्यांच्या विनंतीवरून विधानसभेच्या अध्यक्षांनीच आमदार अर्जून खोतकर यांचे स्वियय सहाय्यक किशोर पाटील याचे निलंबन करण्याची घोषणा कली असून या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत, ही अभिनंदनाची बाब आहे. २०१७ मध्ये सुध्दा असाच प्रकार धुळे जिल्ह्यात घडला होता.यात धुळे जिल्हापरिषदेचे तत्कालीन उपमुख्यकार्यकारी तुषार माळी यांना अटक करण्यात आली होती. प्रश्न या ठिकाणी थांबत नाहीत. परंतू राजकीय व्यवस्था कोणत्या दिशेने वाटचाल करते आहे याबाबत सामान्य माणूस चितींत आहे. त्याच्या मनात अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. एका पक्षाचे दोन पक्ष होणे, खोके घेण्याचा जाहिर आरोप हे लोकशाही व्यवस्थेत खरोखरच बसते आहे का? यावर चिंतन करण्याची गरज आहे. राजकारणात सर्व काही शक्य आहे असे म्हटले तरी राजकारणातील 'आदर्श'व्यक्तिचा इतिहास सुध्दा महत्वाचा आहे. राजकारणात सुध्दा "हमाम मे सब नगें"असा प्रकार होत असेल तर येणार्या पिढया कुणाचे समोर 'नतमस्तक' होतील? असा प्रश्न आमच्या समाजवादी मित्राला पडला आहे. त्यामुळे विश्राम गृहात जी रक्कम आली ती आकाशातून तर पडली नाहीच, पाण्यात वाहून आली नाही. मग ती आणली कुणी आणि आली कुठून ? हा प्रश्न अनुतरीत राहता कामा नये. विधानसभेच्या अध्यक्षांनी या घटनेची गांभिर्याने दखल घेवून चौकशीचे आदेश दिले असले तरी ही चौकशी सत्याच्या मार्गाने झाली पाहिजे अन्यथा अशा चौकशा समित्यांवरून सुद्धा नागरीकांचा विश्वास उडेल. या प्रकरणात असे होवू नये व सत्य बाहेर यावे ही जनभावना आहे.